# अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, यवतमाळ

प्रेसनोट दिनांक २१.४.२०२३

.......................................................................................................................................

**दहा महिन्यापासून गायब अल्पवयीन तरूणीसह फरार आरोपी ताब्यात**

**अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभागाची कार्यवाही –**

एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस दिनांक ४/०७/२०२२ रोजी कोणी अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची फिर्याद तरूणीच्या आईने पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथे दिली होती. अवधुतवाडी पोलीसांनी शोध घेवून देखील ती न मिळून आल्याने सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधिक्षक सो यांनी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक विभाग यवतमाळ यांचेकडे सोपवून पिडीत तरूणीचा शोध घेणेबाबत निर्देश अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक विभागास दिले होते.

पोलीस निरीक्षक विलास कुलकर्णी यांनी या गुन्हयाचा सखोल तपास सुरू केला. तपासा दरम्यान त्या मुलीस अजय रंजीत फुलझेले वय २७ वर्ष, रा. उमरसरा यवतमाळ याने फूस लावून पळवून नेल्याचे निष्पन्न झाले. सायबर सेलच्या तांत्रीक सहकार्याने पिडीत मुलगी व आरोपीचा शोध घेतला असता दोघेही मुंबई येथे राहत असल्याचे निष्पन्न झाले. पो.नि. कुलकर्णी हे सायबर सेलच्या मदतीने सदर जोडप्याचे सतत मागावर होते.

आज दिनांक २१/४/२०२३ रोजी सकाळी ते मुंबई येथून यवतमाळ येथे आल्याची गोपनिय माहिती प्राप्त होताच पिडीत अल्पवयीन मुलगी व आरोपी अजय रंजीत फुलझेले यांना ताब्यात घेवून पुढील तपासकामी पोलीस स्टेशन अवधुतवाडी यांचे स्वाधीन करण्यात आले आहे.

ही कार्यवाही मा. डॉ. पवन बनसोड पोलीस अधीक्षक सा. यवतमाळ व मा. अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप सा. यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. विलास कुलकर्णी, सफौ. अरविंद बोबडे, मपोहवा अर्चना मेश्राम व चापोका पवन राजे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

२१/४

विलास कुलकर्णी
पोलीस निरिक्षक